महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

सोमवार, दिनांक १९ मार्च, २०१८ / फाल्गुन २८, १९३९ (शके)

(१)	**आदिवासी विकास मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**उद्योग, खनिकर्म मंत्री**	
(३)	**ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**	
(४)	**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**	
(५)	**सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ३०

वसतिगृहांचे बंद परिपोषण अनुदान सुरु करुन रक्कमेत वाढ करण्याबाबत

(१) * **३७७३५ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग व इतर अशा एकूण २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांपैकी ७८५ वसतिगृहांकडे मूळ मान्यता आदेश नसल्याचे तसेच कागदपत्र पडताळणीचे कारण दाखवून समाजकल्याण आयुक्तांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ च्या आदेशानूसार मागील १ वर्षापासून अनुदान बंद केले असल्याने ८०० अनुदानित वसतिगृहातील १ लाख विदयार्थ्यावर उपासमारीची पाळी आली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयार्थ्याच्या पालनपोषणासाठी शासनाकडून प्रति विदयार्थी दरमहा रुपये ९००/- अनुदान दिले जात असून प्रत्येक विदयार्थ्याला ३० रुपयांमध्ये एक दिवस नाश्ता, दुपार व संध्याकाळी सकस आहार देणे अपेक्षित असले तरी सदर रक्कम अत्यंत कमी असल्याने संबंधित संस्था व विदयार्थ्याची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या देण्यात येत असलेली अनुदानाची रक्कम रुपये ९००/- इतकी अपुरी पडत असल्याने अनुदानात किमान प्रति विद्यार्थी रुपये १५००/- प्रति माह वाढ करण्याची मागणी व्यवस्थापनाकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर परिपोषण अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अनुदानित वसतिगृहांकडील काही वसतिगृहांकडे मान्यता नसतानांही सदर वसतिगृहे अनुदान घेत असल्याचे दिसून आल्यामुळे शासनाने अशा वसतिगृहांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला होता.

(२) अनुदानित वसतिगृहांच्या परिपोषण अनुदानात वाढ करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) होय.

(४) अनुदानित वसतिगृहाचे परिपोषणासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आलेला असून, अनुदानित वसतिगृहाच्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासंदर्भात बैठका घेण्यात आल्या असून त्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(२) * ३८७३२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८६० ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील जात पडताळणीच्या कामांसाठी केवळ चार अध्यक्ष कार्यरत असल्याने सुमारे तीन लाखाहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी हजारो विद्यार्थांना तसेच शासकीय नोकरीत रुजू होणाऱ्या उमेदवारांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अध्यक्षांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी १८ समित्यांच्या अध्यक्ष पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून समित्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची ४६६८९ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) अध्यक्षांच्या रिक्त पदावर पदोन्नतीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागामार्फत करण्यात येते. तसेच, उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत अध्यक्षांच्या पदांच्या समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आलेली आहे. त्याद्वारे अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर सदर पदांवर प्राधान्याने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(३) * ३८२३७ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४१५ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागाने केलेल्या साहित्य खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन रक्कम वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडांचे नियमबाह्यरित्या वाटप केल्याबाबत

(४) * ३९०९४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी.) १७८ भूखंडांचे नियमबाह्यरित्या वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रथम येणाऱ्यास प्राथम्याने भूखंड देणे बंधनकारक असताना तसेच भूखंडवाटपासाठी उच्चस्तरीय समितीपुढे प्राथम्यक्रमाचा प्रस्ताव ठेवणे आवश्यक असताना विभागीय अधिकारी यांनी परस्पर भूखंडाचे वाटप केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणी महामंडळस्तरावर चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीमध्ये भूखंड वाटपामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले. संबंधित प्रादेशिक अधिकारी यांची विभागीय चौकशी करणेकरिता प्रस्ताव महसूल विभागास पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेतील महसूली अधिकारी व संबंधितांची चौकशी करण्याबाबत

(५) * ३८४६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४५१ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील थकबाकीदारांविरूध्द कलम १५६ अन्वये मा.सहकार न्यायालय यांनी आदेश देऊनही विहित मुदतीत वसुलीची अंतिम कार्यवाही न करता वेळ काढू धोरण राबविल्याबाबत दोषी विशेष वसुली अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी पाथरी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव, सहकार यांच्याकडे दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) होय.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ३ विशेष वसूली अधिकारी यांचे कामकाज समाधानकारक नसल्याचे आढळून आले. त्यांच्याविरूध्द बँक स्तरावरून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

इगतपुरी (जि.नाशिक) ऐवजी कांबळगांव (जि.पालघर) येथे क्रीडा प्रबोधिनी उभारण्यात येणार असल्याबाबत

(६) * ३७९५९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९९ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करून काम सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामास दिनांक २९ मे, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता देऊनही दळणवळणाची साधने व तज्ञ प्रशिक्षकांची उपलब्धता नसल्याने सदर क्रीडा प्रबोधिनी कांबळगांव (जि.पालघर) येथे सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी कांबळगांव येथे क्रीडा प्रबोधिनी सुरु करण्यास माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान विरोध केला असून सदर क्रीडा प्रबोधिनीत अनुसूचित जमातीची ३७ मुले व १९ मुली प्रवेशित असून त्या विद्यार्थ्यांना नाशिक येथे प्रवास करणे शक्य नसल्याने व त्यांच्या वास्तव्याची होत असलेली गैरसोय विचारात घेता तात्पुरत्या स्वरुपातील व्यवस्थेऐवजी इगतपुरी येथेच क्रीडा प्रबोधिनीचे काम सत्वर सुरु करण्याची तसेच त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र स्थापन करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(२) इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद केली नसल्याने सदर क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सद्य:स्थितीत आदिवासी विभागाच्या चार अपर आयुक्त कार्यालयांतर्गत एक याप्रमाणे चार क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्याचा विभागाचा मानस आहे. त्यानुषंगाने कांबळगाव, जि.पालघर येथील क्रीडा प्रबोधिनीबाबत कार्यवाही प्रगतीपाथवर आहे. याव्यतिरिक्त इगतपुरी, जि.नाशिक येथे क्रीडा प्रबोधिनीचे बांधकाम सुरू करण्याच्यादृष्टीने निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

(७) * ३९१७८ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील रेशीम शेतीतील रेशीम किडे अज्ञात रोगाने मृत होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रेशीम उद्योग बाधित शेतकऱ्यांना मदत मिळणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) मौजे कडती, ता.जि.हिंगोली परिसरातील एकूण २७ शेतकऱ्यांना २०/११/२०१७ या उबवणी तारखेची लॉट नंबर ११३ मधील सी.एस.आर. वाणाची ३५०० अंडीपुंज वितरीत करण्यात आली होती. प्रस्तुत शेतकऱ्यांपैकी १४ शेतकऱ्यांच्या तुती बागेच्या क्षेत्रातील कापुस, तूर व हरभरा या पिकांवर

झालेल्या विषारी किटक नाशकांच्या फवारणीतील काही अंश तुती पाल्यावर आल्याने, तो पाला रेशीम किटकांच्या खाण्यात आल्यामुळे किटकांना विषबाधा झाली आहे. केंद्र पुरस्कृत CDP योजनेमध्ये रेशीम किटकांचा विमा काढण्याची तरतूद होती. तथापि, प्रस्तुत योजना २०१५-१६ मध्ये बंद झाल्यामुळे त्यांना विमा देता आलेला नाही.

त्यामुळे प्रस्तुत बाधित शेतकऱ्यांच्या क्षेत्राचा दिनांक २९/१२/२०१७ रोजी पंचनामा करून अहवाल तहसिलदार, हिंगोली यांच्याकडे सादर करण्यात आला.

त्यानुसार तहसिलदार, हिंगोली यांनी दिनांक ०७/०३/२०१७ रोजी दिलेल्या अहवालानुसार प्रचलित शासन निकषाप्रमाणे रेशीम किटकाच्या नुकसानी बाबत शासनातर्फे कोणतीही आर्थिक मदत देण्याची तरतुद नियमात नाही, असे संबंधित शेतकऱ्यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया ग्रामीण उपविभागात कृषी पंप वीज जोडणी योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

(८) * ३७९३७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.मितेश भांगडिया, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.परिणय फुके : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया ग्रामीण उपविभागात अभियंत्यांनी कृषी पंप वीज जोडणी योजनेतून आरएसी एसपीए अंतर्गत एकाच ग्राहकाला एकाच गटात दोन वेळा कृषी जोडणी दाखविणे, एकच मंजूरी आदेश व अंदाजपत्रक तयार करणे, एकाच कामाच्या वेगवेगळ्या तारखांना निविदा मागवून बनावट व खोटे देयक तयार करुन ते कंत्राटदाराच्या नावे अदा करुन सुमारे ३५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास रामनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार हा दिनांक १ एप्रिल, २०१० ते ३१ मार्च, २०१३ या कालावधीत केलेला असून याचे संपूर्ण विभागीय अंकेक्षण झालेले असूनही उक्त गैरव्यवहार हा ऊर्जा विभागाच्या विभागीय अंकेक्षणात निदर्शनास आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) सदर गुन्हा नोंदविल्याची बाब दिनांक ३०/१२/२०१७ रोजी निदर्शनास आली. परंतु रुपये ३५ ते ४० लाखांचा गैरव्यवहार झाला आहे हे खरे नाही. चौकशीअंती असे निदर्शनास आले आहे की, ९ ग्राहकांपैकी ६ ग्राहकांचे नविन कृषी पंप जोडणीबाबत दोनदा बिलिंग झाल्याची रक्कम रुपये १,७१,१५८/- इतकी आहे.

(२) दोनदा बिलिंग होण्याची बाब ही कामाच्या प्रत्यक्षस्थळी होणाऱ्या मोजमापावर अवलंबून असल्याने अंकेक्षण विभागाच्या निदर्शनास आली नाही.

(३) देवरी कार्यकारी अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने सर्वसाधारण चौकशी करुन दिलेल्या अहवालावर तक्रारदार विजय महेश गुप्ता यांचे समाधान न झाल्यामुळे तद्नंतर परिमंडळस्तरावर संबंधित प्रकरणात अधिक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन पुर्न:चौकशी करण्यात आली.

दोन्ही समितीचे अहवाल पडताळणीनंतर अतिरिक्त कारवाई करण्यासाठी कोणतीही बाब समोर आलेली नाही. सदर समितीच्या अहवालानुसार ५ अधिकारी दोषी असल्याचे आढळून आले. त्यापैकी १ अधिकारी मृत असल्यामुळे इतर ४ अधिकाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र देऊन विभागीय चौकशीची कारवाई सुरु आहे. तसेच संबंधित दोन कंत्राटदाराकडून दोनदा बिलिंग झाल्याची रक्कम व्याजासह वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रानवडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील सावित्री धरणाच्या बुडीत क्षेत्रातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

(९) * **३८६७९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानबाजीरे (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे सुमारे २० वर्षापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बांधलेल्या सावित्री धरणाच्या बुडीत क्षेत्रात रानवडी येथील रस्ता पाण्याखाली गेल्यामुळे तेथे औद्योगिक विकास महामंडळाने पुल बांधून रस्ता करून दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षापासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सदर रस्त्याच्या दुरूस्तीचे काम केले नसल्यामुळे रस्ता वाहतुकीस धोकादायक झालेला असून सदर रस्त्याची दुरुस्ती न केल्यास रानवडी, घागरकोंड व बोरावळे या तिन्ही गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) औद्योगिक धोरण २०१३ अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून रस्ता बांधण्याचा महामंडळाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यांतर्गत आदिवासी विकास प्रकल्पाच्या कायापालट योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(१०) * ३९२५४ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यांतर्गत आदिवासी विकास प्रकल्पाच्या सन २०१७-१८ मधील कायापालट योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्प कार्यालयाच्या सी.सी.डी. योजनेंतर्गत सन २००७ मध्ये रुपये ८८ लाख इतके विशेष केंद्रिय अनुदान प्राप्त झाले असतांना तत्कालीन पी.ओ. डाखोरे यांनी या कामासाठी ई-निविदा प्रक्रिया न राबवता ठेकेदारामार्फत सदर योजना राबवून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामात अनियमितता झाली असल्याने जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२) व (३) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यांतर्गत आदिवासी विकास प्रकल्पाच्या सन २०१७-१८ मधील कायापालट योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब खरी नाही. तसेच जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ यांचेकडील या संदर्भातील पत्र प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांना प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील वीज प्रकल्प बंद असताना नवीन वीज प्रकल्प सुरु करणार असल्याबाबत

(११) * ३९५४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज ग्राहकांवर महाग विजेचा भुर्दंड पडू नये म्हणून विजेची मागणी पूर्ण करताना वीज दराच्या निकषावर सर्वात स्वस्त वीज आधी व महाग वीज गरज पडली तर शेवटी घ्यावी असा दंडक (मेरीट ऑर्डर डीसपॅच) राज्य विद्युत आयोगाने घालून दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वीज प्रकल्प सदरहू निकषात बसत नसल्याने त्यांचे वीज संच बंद ठेवावे लागत असून त्यांची एक युनिटही वीज न वापरता प्रकल्प उभारणीच्या खर्चापोटी स्थिर वीज आकार म्हणून रुपये ३८०० कोटीचा भुर्दंड वीज ग्राहकांवर पडत असतानाही महानिर्मिती नवीन वीज प्रकल्प सुरु करण्याच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन प्रकल्प सुरु करण्याची कारणे काय आहेत, प्रस्तावित नवीन प्रकल्पांचे स्वरुप काय आहेत,

(४) तसेच सध्या बंद असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे व त्यामुळे ग्राहकांवरील भार कमी होऊन बंद प्रकल्प सक्षमपणे कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मा.वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज खरेदी करारातील तरतूदीनुसार निर्मिती संचाचे स्थिर आकार देणे बंधनकारक आहे. वीज निर्मिती संच वीज मागणीच्या प्रमाणात मेरीट ऑर्डर डीसपॅच (MOD) तत्वानुसार चालविले अथवा बंद केले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बदलापूर, अंबरनाथ (जि.ठाणे) येथील सदोष वीज मीटरमुळे ग्राहकांच्या वीज देयकात वाढ होत असल्याबाबत

(१२) * ३९६४५ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर, अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात २० हजाराहून अधिक वीज मीटर सदोष असल्याचे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या पंधरवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज मीटरचे युनिट नोंदणी करणाऱ्या व्यक्तींच्या निष्काळजीपणामुळे बदलापूर पश्चिमेतील जाधव कॉलनीत राहणाऱ्या निलिमा चिंदरकर यांचे एका महिन्याचे घरगुती वापरासाठीचे देयक ५६९३ युनिट नोंदविले गेल्याने त्यांना महावितरणकडून रुपये ८२ हजारचे वीज देयक देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) बदलापूर, अंबरनाथ (जि.ठाणे) शहरात एकूण १४५१९ वीज मीटर सदोष असल्याचे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या पंधरवड्यात निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबत महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत सदर ग्राहकास एप्रिल, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या दरम्यान सदोष बिले प्राप्त झाली व माहे डिसेंबर, २०१७ मध्ये योग्य रिडींग प्राप्त झाल्यामुळे

ग्राहकाला एकूण ८ महिन्याचे एकत्रित घरगुती वापरासाठीचे देयक ५६९३ युनिट नोंदविले गेल्याने त्यांना महावितरणकडून रुपये ८२ हजाराचे वीज देयक देण्यात आले. एप्रिल ते नोव्हेंबर, २०१७ या महिन्याचे भरलेले देयक वजा करुन रुपये ३१,१८०/- चे दुरुस्त वीज देयक देण्यात आले आहे. चौकशीत एजन्सीने सदोष व चुकीचे रिडींग घेतल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर एजन्सीस डिसेंबर, २०१७ मध्ये घेतलेल्या चुकीच्या रिडींगसाठी रुपये २७,८८२/- इतका दंड लावण्यात आला असून सदरची रक्कम एजन्सीच्या देय असलेल्या बिलातून कपात करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. संस्थेच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

(१३) * ४०१७८ श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७७६ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेच्या गैरव्यवहाराची आर्थिक व प्रशासकीय चौकशी करणेकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अहवालाचे अवलोकन करणे, उपनिबंधक यांनी संबंधितांवर आर्थिक जबाबदारी निश्चित करणे, सहकारी अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकारी नियुक्त करणे आणि याबाबतचा अहवाल कार्यालयास सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी अधिनियम कलम ८३ अन्वये अहवाल प्राप्त होण्यास विलंब झाल्याने गैरव्यवहार करणाऱ्या माजी संचालकांना त्याचा फायदा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी अधिनियम कलम ८८ अन्वये अहवाल प्राप्त झाला आहे काय वा किती कालावधीत प्राप्त होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) व (३) जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेतील गैरव्यवहार व ग्राहक कर्जाची चौकशी करण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक ०७/०६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री.शिवाजी शिंदे, सनदी लेखापरिक्षक यांना प्राधिकृत केले आहे. संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांनी त्यांच्या दिनांक २१/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई यांना सादर केला आहे.

वरील चौकशी अहवालात नमूद करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने संस्थेच्या संबंधित पदाधिकाऱ्यांवर आर्थिक जबाबदारी निश्चित करण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ नुसार श्री.विजय गवळी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई-४ यांची दिनांक ३०/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक केली असून कायद्यातील तरतूदींप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी. चाळीतील वसतिगृहांच्या दुरवस्थेबाबत

(१४) * ४०४६९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्रमांक ११८ या इमारतीमध्ये शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह, संत मिराबाई मुलींचे वसतिगृह व मागासवर्गीय शासकीय मुलांचे वसतिगृह अशी तीन मागासवर्गीय वसतिगृहे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतिगृहांतील स्वच्छतागृहे, स्नानगृहे व स्वच्छतागृहाच्या स्लॅबमधून होणारी गळती, उघडे विजेचे मिटर, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा, वसतिगृह इमारतीच्या परिसरातील अवैध पार्किंग, वसतिगृहातील अस्वच्छता, सांडपाण्याची समस्या, वसतिगृहांच्या इमारतींच्या दारे-खिडक्यांची झालेली दुरवस्था इत्यादी अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहातील काही खोल्यांमध्ये घुसखोरी करुन काही लोक बेकायदेशीर वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वसतिगृहातील गैरसोई दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय.

(२) या वसतिगृहांच्या देखभाल व दुरूस्तीची कामे वेळोवेळी करण्यात आलेली असून, सदर वसतिगृह सुस्थितीत आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पत संस्थेत अपहार झाल्याबाबत

(१५) * ४०७५७ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील सेवाभावी ब्राम्हण नागरी सहकारी पत संस्थेत रुपये १६ कोटीचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

सन २०१६-१७ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार रुपये १५.४६ कोटी रक्कमेचा अपहार झाल्याचे आढळून आले आहे.

(२) या संस्थेच्या सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची छाननी करण्यात आली.

त्याप्रमाणे लेखापरीक्षकांनी संस्थेचे मागील ५ वर्षाचे फेरलेखापरिक्षण करण्याची शिफारस केली आहे. त्यानुषंगाने सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाचे फेरलेखापरिक्षण करणेसाठी श्री.एस. व्ही. सासवडकर, लेखापरिक्षक श्रेणी-१, सहकारी संस्था, चिपळूण यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान संस्थेच्या सन २०१६-१७ या कालावधीच्या लेखापरिक्षण अहवालानुसार पत संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेचे संचालक, व्यवस्थापक व अल्पबचत एजंट यांचेवर दिनांक ३१/०१/२०१८ रोजी पोलीस स्टेशन, चिपळूण येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील शेतकरी कर्जमाफीपासून वंचित असल्याबाबत

(१६) * ४०८९२ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानाच्या ४ याद्या प्रसिध्द झाल्या परंतू पात्र-अपात्रतेबाबतची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या कर्जमाफी योजनेमधील जाचक अटींमुळे जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील कर्जमाफीच्या पात्र-अपात्रतच्या प्रलंबित याद्यांना मंजूरी देऊन तातडीने शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देणे तसेच ७५ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या कक्षेत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे. शेतकऱ्यांच्या अर्जावर योजनेतील निकषानुसार लाभ देण्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(२) नाही.

(३) सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक ०७/०३/२०१८ पर्यंत एकूण १,०८,५५७ खातेदारांना रूपये २२५.४० कोटीचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरीत पात्र अर्जदारांना योजनेच्या निकषांप्रमाणे लाभ देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

योजनेच्या निकषांनुसार अर्ज करण्यास वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने दिनांक १ मार्च, २०१८ ते ३१ मार्च, २०१८ पर्यंत अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्याप्रमाणे अर्ज प्राप्त होण्यास सुरूवात झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुखेड (जि.नांदेड) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने नियमबाह्यरित्या भूखंडाचे नुतनीकरण व हस्तांतर केल्याबाबत

(१७) * ४०९०२ श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) कृषी उत्पन बाजार समितीच्या संचालक मंडळाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करुन भूखंडाचे नुतनीकरण व हस्तांतर केले असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भ्रष्टाचाराविरोधात बाजार समितीसमोर धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संचालक मंडळावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) व (२) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भूखंड वाटपाबाबत दिनांक ९/१/२०१८ रोजी तक्रार प्राप्त झाली असून त्याबाबत चौकशी करण्यात येत आहे.

काही व्यक्तींनी भाडेपट्टे मुदतवाढ व जमाखर्च व ताळेबंदाच्या सत्यप्रती मिळण्याबाबत बाजार समितीकडे अर्ज दिला होता. बाजार समितीने सदर माहिती देण्याचे नाकारल्याने त्या व्यक्तींनी कृषी उत्पन्न बाजार समिती, मुखेड यांच्या कार्यालयासमोर दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी धरणे आंदोलन केले होते.
(३) सद्य:स्थितीत चौकशी करण्यात येत आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

साखर कारखानदार ऊसाला भाव देण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत

(१८) * ४०९४७ श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात साखरेचे भाव कमी असल्याचे कारण देत साखर कारखानदार ऊसाला शासनाने मान्य केलेला भाव देण्यास टाळाटाळ करीत असून काही कारखान्यांची एफआरपी सुध्दा देता येत नसल्याने आंदोलन करण्याचा इशारा ऊस उत्पादक संघर्ष समितीने दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साखरेच्या भावावरुन ऊसाचा भाव ठरविण्याऐवजी ऊसाच्या भावावरुन साखरेचा भाव ठरवावा व ऊसाला उत्पादन खर्चावर आधारीत किमान समान पहिली उचल देण्याचे धोरण स्वीकारण्यासंदर्भात समिती स्थापना करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री व मा.सहकार मंत्री यांच्या उपस्थितीत नागपूर येथे संघर्ष समिती सोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार समिती गठीत करण्यात आली आहे काय, असल्यास केंव्हा व समितीमध्ये सदस्य म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

याबाबत उच्चस्तरीय समिती गठीत करणेची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाचगणी येथील ब्लुमिंगडेल स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्याबाबत

(१९) * ४०९५७ श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत शिक्षणासाठी पाचगणीतील ब्लुमिंगडेल स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये सातवीत शिकणाऱ्या श्रध्दा सुभाष गवळी या विद्यार्थीनीचा राहत्या घरी आजारपणाने मृत्यू झाल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रध्दाचा मृत्यू हा शाळा आणि डहाणू प्रकल्प अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे झाला असल्याने दोषी अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन कारवाई करावी, अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा आदिवासी अस्मिता, पालघर या संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प कार्यालय, डहाणू तसेच घोडेगाव येथील सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) यांच्यामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे या योजनेंतर्गत श्रद्धा गवळी ही विद्यार्थीनी ब्लुमिंगडेल इंग्लिश मेडीयम स्कूल, पाचगणी येथे इयत्ता ७ वीमध्ये शिक्षण घेत होती. सदर विद्यार्थीनीस दिनांक १९/०१/२०१८ रोजी सकाळी लघवीचा त्रास होत असल्याने शाळेच्या मुख्याध्यापकांनी खाजगी दवाखान्यात नेले. तेथे सदर विद्यार्थीनीवर उपचार करण्यात आले तसेच तिचे रक्ताचे व लघवीचे नमुने तपासण्यात आले. सदर बाब संबंधित मुख्याध्यापकांनी प्रकल्प अधिकारी, डहाणू यांना पत्रान्वये तसेच विद्यार्थीनीच्या पालकांना दूरध्वनीवरून कळविली.

तद्नंतर दिनांक २१/०१/२०१८ रोजी कु.श्रद्धाचे डोळे पिवळे दिसू लागल्याचे मुख्याध्यापकांच्या निदर्शनास येताच ते तिला घेऊन वाई येथे दवाखान्यात घेऊन जात असताना त्यांना वाटेत विद्यार्थीनीचे पालक भेटले. मुख्याध्यापक तिच्या पालकांसोबत दवाखान्यात गेल्यावर तेथील डॉक्टरांनी कु.श्रद्धाला ॲडमीट करण्यास सांगितले तथापि, तिच्या पालकांनी श्रद्धाला ॲडमीट करण्यास नकार देऊन डॉक्टरांच्या सल्ल्याविरूध्द स्वत:च्या जबाबदारीवर तिला दिनांक २१/०१/२०१८ रोजी घरी घेऊन गेले.

त्यानंतर दिनांक २६/०१/२०१८ रोजी पालकांनी तिला डहाणू येथील खाजगी रूग्णालयात दाखल केले. सदर विद्यार्थीनीस कावीळ झाल्याचे निदर्शनास आले होते. तिचा उपचाराचा खर्च शाळेमार्फत अदा करण्यात येईल, असे संबंधित शाळेने प्रकल्प कार्यालय, डहाणू यांना कळविले होते. दिनांक २९/०१/२०१८ व दिनांक ३०/०१/२०१८ रोजी तिच्या पालकांकडे चौकशी केली असता, श्रद्धाची प्रकृती बरी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर डहाणू येथील रूग्णालयातूनही तिच्या पालकांनी दोन दिवस घरगुती उपचार करतो या कारणास्तव डॉक्टरांच्या सल्ल्याविरूध्द स्वत:च्या जबाबदारीवर तिला दिनांक ३०/०१/२०१८ रोजी घरी नेले.

तथापि, दिनांक ३१/०१/२०१८ रोजी सदर विद्यार्थीनीचा मृत्यू झाल्याबाबत विद्यार्थीनीच्या पालकांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास महामंडळाकडे निधी शिल्लक असल्याबाबत

(२०) * ४०९८३ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाचे जीवनमान उंचविण्यासाठी तेलपंप, एस.डी.पी.आर.पाईप आणि अनुषंगिक गोष्टी देण्यासाठी आदिवासी विकास महामंडळामार्फत लाभार्थी आदिवासींना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३ वर्षापासून रुपये ५० कोटी पेक्षा जास्त रक्कम लाभार्थी आदिवासींना वितरणाविना आदिवासी विकास महामंडळाकडे शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने या प्रकरणात दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.

तेलपंप, वीज पंप व एच.डी.पी.ई.पाईप या योजनांसाठी आदिवासी विकास महामंडळामार्फत लाभार्थ्यांना थेट निधी कधीही उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तसेच कृषी विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३०/१२/२०१७ नुसार सदर योजना आता कृषी विभागामार्फत राबविण्यात येणार असून त्या विभागाकडूनच आदिवासी लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे निधी देण्यात येणार आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तेलपंप, वीज पंप व एच.डी.पी.ई.पाईप खरेदीसाठी प्रसिध्द झालेल्या निविदेस काही तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव विलंब झालेला असून तद्नंतर निविदा रद्द करण्यात आल्या आहेत. यास्तव या प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२१) * ३७७३७ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९६७ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी किंमतीत एफ.ए.क्यू. दर्जाचा शेतमाल खरेदी केल्यास तो गुन्हा ठरविण्यासाठी पणन अधिनियमात सुधारणा करण्याबाबत पणन संचालकाकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत कोणता निर्णय घेण्यात आला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने सदरील अधिनियमातील सुधारणा केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१), (२), (३) व (४) राज्यातील शेतकऱ्यांकडून हमी भावापेक्षा कमी किंमतीत शेतमाल खरेदी केल्यास तो गुन्हा ठरविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. केंद्र शासनाने यासंदर्भात सर्व राज्य शासनांना पाठविलेल्या प्रारुपाप्रमाणे सर्व समावेशक सुधारणा महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये करण्यात येत आहे. यासाठी संबंधित विभागाचे अभिप्राय घेऊन प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

महावितरणने वीज ग्राहकांकडून वसूल केलेली अतिरिक्त रक्कम व्याजासह परत देण्याबाबत

(२२) * ३९०९६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.सुभाष झांबड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणने वीज ग्राहकांकडून वसूल केलेल्या रुपये ३७७ कोटी ८० लाख रकमेचा परतावा हा व्याजासह रुपये ७०० कोटी इतका झाला असून एक वर्ष होऊनही परतावा देण्याबाबतच्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यवतमाळ जिल्ह्यात वीज वितरण कंपनीने वीज देयकात अतिरिक्त आकारणी करुन ग्राहकांची फसवणूक केल्याचे माहे जुलै, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५ ते २००७ या दरम्यान सर्व्हिस लाईन चार्जेस (एसएलसी) रुपये १७८ कोटी २० लाख, आऊटराईट कॉन्ट्रिब्युशन चार्जेस (ओआरसी) रुपये ७२ कोटी ८९ लाख व मीटरसाठी वसूल केलेले रुपये १२५ कोटी ७२ लाख अशी एकूण रुपये ३७६ कोटी ८१ लाख रक्कम वीज महावितरणने ग्राहकांकडून वसूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने महावितरणचे अपिल फेटाळले असल्याने वीज देयके उशिराने भरल्यास वीज ग्राहकांकडून जसे व्याज आकारण्यात येते तसे परतावा न केलेल्या रक्कमेवर महावितरण ग्राहकांना व्याज देणार आहे काय, असल्यास, कधीपर्यंत देण्यात येणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) माहे जानेवारी, २००५ ते एप्रिल, २००७ या कालावधीतील सर्व्हिस लाईन चार्जेसपोटी रुपये १७२.७८ कोटी, आऊटराईट कॉन्ट्रिब्युशन चार्जेस रक्कम रुपये ७१.१९ कोटी व मीटरची किंमतीपोटी रुपये १२२.९२ कोटी महावितरण कंपनीकडे जमा आहेत.

(४) सदर रक्कमेचा परतावा प्रचलित बँक व्याजदराप्रमाणे, व्याजासह करण्यात येणार आहे. यासाठी महावितरण कंपनीने विशेष वेबबेस प्रोग्राम बनविले आहे. ज्या ग्राहकांना परतावा करावयाचा आहे. अशा ग्राहकांच्या नोंदीची पडताळणी झाल्यानंतर लेखापरिक्षीत रक्कमेचा देय बिलामधून परस्पर परतावा करण्यात येणार आहे.

(५) अद्यापपावेतो ७२५ उच्चदाब ग्राहकांच्या सर्व्हिस लाईन आकार, आऊट राईट कॉन्ट्रिब्युशन व मीटर किंमतीपोटी जमा रक्कमेच्या नोंदीच्या पडताळणीअंती लेखापरिक्षीत एकूण रक्कम रुपये ६६६.०५ लाख निश्चित करण्यात आली आहे. सदर रक्कमेचा परतावा संबंधित ग्राहकांना माहे मार्च, २०१८ च्या वीज देयकाद्वारे अदा करण्यात येणार आहे. उर्वरीत सर्व ग्राहकांच्या रक्कमेचा परतावा करण्यासाठी तपासणीची कामे सुरु आहेत.

येवला व नांदगाव (जि.नाशिक) येथे नाशिक व कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय स्थापन करण्याबाबत

(२३) * ३९३८६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९७ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी विकास विभागाच्या नाशिक प्रकल्पाचे तर नांदगाव येथे कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तपासून प्रस्ताव सादर करावा असे मा.आदिवासी विकास मंत्री यांनी निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) नुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, त्यानुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.

(२) येवला व नांदगाव (जि.नाशिक) ही दोन्ही ठिकाणे आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रात येतात. बाह्यक्षेत्रामध्ये फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना अनुज्ञेय आहेत. त्यामुळे नवीन कार्यालयासाठी पुरेसा कार्यभार (Workload) उपलब्ध होत नाही. सदर ठिकाणी नवीन उपकार्यालय सुरु करण्याविषयी व्यवहार्यता तपासून पाहण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विक्रोळी (पूर्व) येथील मे.गोल्ड कॉईन फॅमिली बार ॲण्ड रेस्टॉरंटचा परवाना रद्द करणेबाबत

(२४) * ३९२२७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (पूर्व) येथील मे.गोल्ड कॉईन फॅमिली बार ॲण्ड रेस्टॉरंट एफएल-३ परवाना रद्द करणेबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.विरोधी पक्षनेता यांनी पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॉटेल मालकाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त प्रत्यक्षात जागेवर अनधिकृत बांधकाम करुन अग्निशमन विभागाने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र मधील अटींचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम व संबंधित बारचा परवाना रद्द करण्यासाठी व्यवस्थापनाविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे, तथापि, सदर आस्थापनेस एफएल-३ अनुज्ञप्ती प्रत्यक्ष प्रदान करण्यात आली नव्हती.

(२) राज्य उत्पादन शुल्क विभागाने अनुज्ञप्ती मंजूर केलेली नाही. त्यामुळे नकाशा मंजूर केलेला नाही. सहाय्यक आयुक्त एस वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक २३/०१/२०१८ च्या पत्रान्वये सदर आस्थापनेचे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केल्याचे कळविले असून अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे खाद्यगृह अनुज्ञप्तीही रद्द केली आहे. त्यामुळे एफएल-३ अनुज्ञप्ती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) महानगरपालिकेने अग्निशमन परवाना व खाद्यगृह परवाना रद्द केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात वस्त्रोद्योग धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

(२५) * ४०४७० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वस्त्रोद्योग धोरणाची मुदत संपल्यानंतर नव्या धोरणाला आकार देण्यासाठी अस्तित्वातील उद्योग घटकांना सोयी सवलती देण्याबरोबरच कापुस ते गारमेंट अशी उत्पादन साखळी निर्माण करण्यासाठी सन्माननीय श्री.सुरेश हळवणकर, विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने माहे जानेवारी, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांना अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल सादर करुन तीन वर्षे होऊनही अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.
(२), (३) व (४) राज्य शासनाने वस्त्रोद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये श्री.सुरेश हळवणकर, विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या सूचना विचारात घेऊन तसेच राज्यातील वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी विविध गरजा लक्षात घेऊन शासनाने सर्वसमावेशक असे महाराष्ट्र राज्याचे नविन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ दिनांक १५/०२/२०१८ रोजी जाहीर केले आहे.

सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रिडींग न घेता वीज देयके दिल्याबाबत

(२६) * ४०८९७ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती पंपाची ८० टक्क्याहून अधिक वीज देयके रिडींग न घेता रुपये ६० ऐवजी रुपये १०० इतके वीज देयक देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज देयके नियमित रिडींग घेऊन देणे आणि संजीवनी योजनेतून ५० टक्के सवलत देण्यास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

सांगली जिल्हयांतर्गत एकूण १,८२,१२३ कृषीपंपाना मीटर बसविण्यात आले असून त्यापैकी १,३४,४७७ कृषी पंप ग्राहकांचे माहे सप्टेंबर, २०१७ अखेर महावितरण मोबाईल ॲपद्वारे रिडींग घेऊन रिडींगप्रमाणे बिले देण्यात आली आहेत.

(२) ग्राहकांना नियमित मोबाईल ॲपद्वारे रिडींग घेऊन मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात येतात. मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७ अंतर्गत कृषीपंपाच्या वीज देयकाच्या मुळ थकबाकीची रक्कम सुलभ हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

एकंबी तांडा (ता.औसा, जि.लातूर) येथील अल्पभूधारक शेतकऱ्याला अवास्तव वीज देयक देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(२७) * ४०९०३ श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकंबी तांडा (ता.औसा, जि.लातूर) येथील अल्पभूधारक शेतकरी शहाजी धिरु राठोड यांना महावितरणने रुपये ६० हजारांचे अवास्तव वीज देयक पाठवून त्यांच्या शेतातील शेतीपंप व घराचा वीज पुरवठा मागील दोन महिन्यांपासून खंडीत केला असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज देयक दुरुस्त करुन देण्याची मागणी वारंवार करुनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने या शेतकऱ्याने उजनी येथील वीज वितरण कार्यालयात विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या शेतकऱ्यांच्या वीज देयकाची दुरुस्ती करुन देऊन त्यांच्या शेतातील विद्युतपंपाचा व घराचा वीज पुरवठा तातडीने सुरु करणे तसेच चुकीचे वीज देयक देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) सदर ग्राहकाची डिसेंबर, २०१३ पासूनची सप्टेंबर, २०१७ अखेरपर्यंतची कृषीपंपाची थकबाकी रुपये ६४,४९०/- इतकी असून सदर देयकाचा आजतागायत भरणा केलेला नाही. सदर ग्राहकाचा शेतीपंपाचा विद्युतपुरवठा चालू स्थितीत असून तो खंडीत केलेला नाही.

(२) संबंधित व्यक्तीने दिनांक ०९/०१/२०१८ रोजी काहीतरी प्राशन केल्याचे शाखा अभियंता, औसा यांना समजताच सदर घटनेची माहिती त्यांनी भादा पोलीस स्टेशन, तालुका औसा येथे लेखी स्वरुपात कळविली आहे.

(३) याबाबत महावितरण कंपनीमार्फत चौकशी केली असता सदरील ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत केलेला नव्हता वा कोणत्याही प्रकारची वीज देयक दुरुस्तीबाबत त्यांची तक्रार प्राप्त झालेली नव्हती, असे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

(२८) * ३९३३० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८३६५ ला दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१), (२) व (३) अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी ऐवजी त्यांच्या मानधनात वाढ करण्याचे प्रस्तावित असून अद्याप त्याबाबत शासनाचा अंतिम निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केळवद (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

(२९) * ३९३२५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळवद (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वीज वितरण कार्यालयाने सुरु हंगामात कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता या कार्यालयांतर्गत असलेल्या केळवद, शिरपूर, किन्होळी, वाडी, ब्रम्हपूरी, गिरोबा, हातणी या गावांतील विद्युत पुरवठा पाच दिवस खंडीत केल्यामुळे गहू, हरभरा, तूर, मका, कांदा व भाजीपाल्यांचे पाण्याअभावी नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावातील शेतकऱ्यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास महावितरणच्या कार्यालयावर मोर्चा काढला असता कार्यालयात एकही अधिकारी अथवा कर्मचारी उपस्थित नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वीज पुरवठा खंडीत करणाऱ्या वीज वितरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर गावांना नियमित वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी महावितरणच्या केळवद शाखा कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. कनिष्ठ अभियंता, पाडळी वीज वितरण केंद्र यांचेकडे केळवद शाखा कार्यालयाचा अतिरिक्त पदभार असल्याने सदर मोर्चा आल्याचे त्यांनी प्रधान तंत्रज्ञ यांना कळविले व कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेशित केले. दरम्यान, अध्र्या तासातच बुलढाणा विभागाचे कार्यकारी अभियंता हे घटनास्थळी उपस्थित झाले.
(३) मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजनेची दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंतची मुदतवाढ संपल्यानंतर केळवद शाखेंतर्गत येणाऱ्या एकूण ९० कृषी पंप वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता व त्यांची थकबाकी रक्कम रुपये १५.५० लाख एवढी होती. त्यापैकी सदर योजनेचा लाभ घेऊन ६७ कृषी पंप वीज ग्राहकांनी रुपये ३,२५,०००/- चा भरणा केलेला असल्याने त्यांचा वीज पुरवठा जोडून देण्यात आलेला आहे.

तसेच मलकापूर ग्रामीण-३ अंतर्गत येणाऱ्या मौजे जांभुळ धाबा (ता.मलकापुर, जि.बुलढाणा) व परिसरातील एकूण १५० कृषी पंप वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आलेला होता व त्यांची थकबाकी रक्कम रुपये १५.०० लाख एवढी होती. त्यापैकी सदर योजनेचा लाभ घेऊन ६२ कृषी पंप वीज ग्राहकांनी रुपये १,२५,४८२/- चा भरणा केलेला असल्याने त्यांचा वीज पुरवठा जोडून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्था व शेती पंपाच्या वीज देयकाची रक्कम कमी करण्याबाबत

(३०) * ४०८९८ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्था व शेती पंपाची वीज देयके मीटरप्रमाणे प्रति युनिट २.२५ पैसे प्रमाणे देण्यात येत असून सदर देयके संस्था तसेच शेतकऱ्यांना भरणे शक्य होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देयके कमी करुन प्रति युनिट १.१६ पैसे करावे यासाठी शेतकऱ्यांनी मोर्चे/आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

सहकारी पाणीपुरवठा संस्था (उपसा जलसिंचन योजना) व शेतीपंप वीज ग्राहकांचे वीज देयकांची आकारणी मा.विद्युत नियामक आयोगाच्या निर्धारित केलेल्या दरात शासन अनुदानाची रक्कम वजा करुन, २२/११ केव्ही उच्चदाब सहकारी पाणीपुरवठा ग्राहकांना रुपये १.९७ पैसे प्रति युनिट व कृषी ग्राहकांना रुपये २.१७ प्रति युनिट या दराने सन २०१७-१८ या वर्षामध्ये आकारणी करण्यात येत आहे.
(२) यासंबंधी निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने केलेली मागणी विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.